राष्ट्रमेव जयते





# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

# १७ वा

## वार्षीक अहवाल

## २०१६-१७


पहिला माळा, खत्री कॉम्पलेक्स, वॉलकट कंपाऊंड, अमरावती ४४४६०१

## आमचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान

समाजशिल्पी अभियंता



## मा.ॲड. श्री. पुरुषोत्तम खेडेकर साहेब



**अध्यक्ष**

**इंजि. अविनाश कोठाळे**

M.I.E., L.L.B., ADIM, DMM



**उपाध्यक्ष**

**इंजि. राजेंद्र जाधव**

B.E. (Mech.)

# सन्माननीय संचालक मंडळ - 2017-22


श्री. अरविंद डि. गावंडे
B.E. ( Civil) DIT


श्री. बाळासाहेब वैद्य
M.Sc (F.I.V)


प्रा. अजित बंड
M.sc.(agri)


सौ. किरणताई महल्ले
M.A., L.L.B


प्रा.डॉ. सौ. प्रतिभाताई चिखले
M.Sc., PH.D


सौ. सुजाताताई बावरे
M.A


इंजि. राजेन्द्र अढाऊ
B.E. (Civil)


श्री. सुचित रा. चाफले
M.Sc. (Agri) A.H.D


श्री. संजय ढोरे
M.Com., L.L.B


प्रा. शरद बंड
M.Sc.


इंजि. मोरेश्वरराव वानखडे
B.E.


श्री. बबनराव आवारे
B.A


श्री. विलासराव राऊत

# सन्माननीय संचालक मंडळ - २०१६-१७

# जिजाऊ बँकेचे अधिकारी वृंद



**श्री. रामचंद्र ठाकरे**
मुख्य कार्यकारी
अधिकारी



**श्री. शरद भोकरे**
उपमुख्य कार्यकारी
अधिकारी



**श्री. हरिश वाशिमकर**
वरिष्ठ शाखा व्यवस्थापक
शाखा, अकोला



**श्री. मनिष बोडखे**
शाखा व्यवस्थापक
मुख्य शाखा, अमरावती.



**श्री. राजेश चंड**
शाखा व्यवस्थापक
शाखा शास्त्री नगर



**श्री. सुरेश गावंडे**
शाखा व्यवस्थापक
नागपूर



**श्री. विजय डोंगे**
शाखा व्यवस्थापक
अचलपूर



**श्री. अविनाश गिरधारे**
शाखा व्यवस्थापक
चांदूर बाजार



**श्री. विलास सवारे**
शाखा व्यवस्थापक
मोर्शी




**श्री. शैलेश यादव**
शाखा व्यवस्थापक
दर्यापूर



**श्री. आशिष कोकमारे**
शाखा व्यवस्थापक
अकोला



**श्री. योगेश ठोरे**
शाखा व्यवस्थापक
यवतमाळ



**श्री. मंगेश कडू**
शाखा व्यवस्थापक
साईनगर, अमरावती.



**श्री. प्रमोद पिंजे**
शाखा व्यवस्थापक
मोर्शी नगर, अमरावती.

# निमंत्रण

जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटीव्ह बँक लि.,

अमरावती या आपल्या बँकेची

**वार्षिक सर्व साधारण सभा**

रविवार, दि. २४/०९/२०१७

**रोजी सकाळी ११ वा.**

**राजवाडा सभागृह, हॉटेल गौरी इन,**

**मोर्शी रोड, अमरावती.**

येथे आयोजीत केलेली आहे.

सभेची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सभासदांच्या सन्मानार्थ

**स्नेहभोजन** कार्यक्रम आयोजित केला आहे.

यासाठी हे अगत्यपूर्वक निमंत्रण.

* विनीत *

**संचालक मंडळ**

जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटीव्ह बँक लि.,

अमरावती.

# सर्व सभासदांना विनम्र आवाहन

- अद्यापपर्यंत ज्या सभासदांना शेअर सर्टीफिकेट मिळाले नाही त्यांनी बँकेस लेखी पत्र अद्यावत पत्यासह अचुक मोबाईल, फोन नंबर सह द्यावे.
- ज्या सभासदांनी अजुनपर्यंत बचत खाते सुरु केले नाही. त्यांनी बचत खाते काढावे ही विनंती, बँकेतर्फे दरवर्षी भागभांडवलदारांना लाभांश (डिव्हीडंट) त्यांचे बचत खात्यामध्ये जमा केल्या जातो. डिव्हीडंट वारंट प्रत्येक भागधारकास बँकमध्ये नोंद असलेल्या पत्त्यावर पाठविण्यात येतात.
- आपला पत्ता व वारस इत्यादी मध्ये बदल झाला असल्यास बँकेस कळवावे, म्हणजे संगणका मध्ये योग्य नोंद करता येईल. व अचुक पत्यामुळे बँकेला संपर्क साधणे शक्य होईल.
- आपण जिजाऊ बँकेतील सर्व ठेव योजनांचा लाभ घ्यावा व इतरांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावे आणि संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा कोणत्याही सहकारी बँकेत रक्कम गुंतवणुक करतांना सातत्याने तीन वर्ष बँक नफ्यात असेल, सभासदांना १२ ते १५ % लाभांश दिला असेल , तथा नक्त अनुउत्पादकर्ज 0% असेल व भागभाडंवल पर्याप्तता (CRAR) किमान १५% चे वर असेल तेथेच रक्कम सुरक्षित आहे असे समजावे.
- मुदती ठेवीवर रु. १०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त व्याज मिळत असल्यास बँकेस व्याजाच्या रक्कमेच्या १०% इतका आयकर भरणे अनिवार्य झालेले आहे. कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे ज्या सभासदांनी पॅन नंबर दिलेला नसेल त्यांचा २०% इनकम टॅक्स कापावयाचा आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी आयकर लागत असेल किंवा नसेल तरी सुध्दा पॅन नंबर काढणे आवश्यक झालेले आहे. सर्व खातेदारानी फॉर्म क्र.१५ जी व १५एच भरून आयकर कापण्याची जबाबदारी स्वत: घ्यावी. अन्यथा एकुण गुंतवणूकीमध्ये १०,००० पेक्षा व्याज जास्त मिळाल्यास सदर व्याजामधुन आयकर बँकेला कापावा लागेल. कृपया सहकार्य करावे.
- ज्या सभासदांना रु. १०,०००/- किंवा जास्त व्याज त्यांच्या जमा ठेवीवर मिळत आहे. परंतू त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न रु. २,५०,०००/- पेक्षा जास्त नाही व वरिष्ठ नागरिकांसाठी रु. ३ लक्षापेक्षा जास्त नाही ते फॉर्म नंबर १५ एच व १५ जी दरवर्षी एप्रिलमध्ये किंवा खाते उघडतांना देवून टॅक्स कपात वाचवू शकतात. सदर सुवीधा लाभ घावा.
- सर्व कर्जदार सभासदांनी कर्जफेड वेळेवर व मुदतीत करून संस्थेस सहकार्य करावे.
- आपण ज्या कर्जदारास जामीन आहात ते कर्जदार कर्जाचे हप्ते वेळेवर भरतात किंवा नाही याकडे कर्जदाराच्या जामीनदारांनी विशेष लक्ष द्यावे. सदर कर्जाची जोखीम एकत्रीत आहे.
- आपली बँक, आपले कर्ज, आपले ठेवीदारांचा विश्वास, हाच सहकाराचा मुलमंत्र यशस्वी करण्यासाठी सर्व सभासद, हितचिंतक, ठेवीदार कर्जदार यांनी त्यांचा सक्रीय सहभाग बँकेस द्यावा. हि विनंती !

## जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक, लि. अमरावती.

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्पलेक्स, वॉलकट कंपाऊंड, अमरावती.
फोन नं. : २५६००५७ , २५७००५६, फॅक्स : (०७२१) २५६६१५६
नोंदणी क्र. : एटीआय/बिएनके/(ओ)/३१२/९९/ दि. ३१.०३.१९९९
आर.बी.आय. /परवाना/व्ही.बी.आय.डी. /नागपूर/एस.एल./००१२/दि. १६/६/२०००
Email - jijaubankamravati@gmail.com Website : jijaubankamravati

क्र. जिजाऊ/वा.स.सा. सभा/३०४/२०१७
दिनांक : ८ सप्टेंबर, २०१७

सन्माननीय,
**भागधारक सभासद,** बंधू/भागिनींनो,
**सस्नेह जय जिजाऊ !**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि. अमरावती. ची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक २४/०९/२०१७ रोजी सकाळी ११ वाजता,** राजवाडा सभागृह, **हॉटेल गौरी इन, मोर्शी रोड, अमरावती.** येथे खालील विषयानुसार कामकाज करण्याकरीता आयोजीत केली आहे. आपण सभेकरीता निमंत्रित असल्याने उपस्थित राहावे ही नम्र विनंती !

संचालक मंडळाचे आदेशान्वये
**रामचंद्र ग. ठाकरे**
मुख्य कार्यपालन अधिकारी

**सभेची विषय पत्रिका :**

१) दिनांक ११ सप्टेंबर २०१६ रोजी झालेल्या १६ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) इ. सन २०१६-१७ (३१ मार्च २०१७) चा वार्षिक अहवाल, अंकेक्षित हिशोबाची पत्रके, ताळेबंद, नफा तोटा पत्रक मंजुर करणे.
३) इ.सन २०१६ - १७ या वार्षिक वर्षात झालेल्या नफ्याचे विनियोजनास मंजुरात प्रदान करणे.
४) बँकेचे सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे व सन २०१६ -१७ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मंजुरात देणे.
५) सन २०१७-१८ करिता बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणे.
६) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील सन २०१६ -१७ या आर्थिक वर्षात येणे बाकी कर्ज प्रकरणांची माहिती घेणे.
७) बँकेच्या वार्षिक विकास आराखड्यास व दिर्घ मुदती विकास आराखड्यास मंजुरात प्रदान करणे.
८) एकरकमी कर्ज परतफेड प्रकरणांना व निर्लेखन करावयाच्या कर्जप्रकरणांना मान्यता प्रदान करणे.
९) बँकेचे आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संवैधानिक लेखापरिक्षकाची (सनदी लेखापालाची) नियुक्ती करणे
१०) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या संविधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल व त्रूटी पुर्तता अहवालची नोंद घेणे.
११) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखा परिक्षक नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१२) संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मान्यता प्रदान करणे.
१३) मा. अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

टिप : १) गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासा नंतर त्याच दिवशी त्याच विषयावर व त्याच ठिकाणी घेण्यात येईल. व सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) बँकेचे कामकाजाविषयी सभासदांना प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर बँकेस द्यावे व पोच घ्यावी.
३) बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडून लाभांश/धनादेश बचत खात्यामध्ये जमा करावेत, बँकेत ज्या भागधारकांचे बचत खाते आहे त्यांच्या खात्यात कर्ज असल्यास कर्जाचे खात्यात लाभांश जमा केला जाईल.
४) भागधारकांनी वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी व भाग प्रमाणपत्राकरीता अचूक पत्ता बँकेत नोंदवावा.
५) सर्व भागधारकांनी के वाय सी ची पूर्तता करावी म्हणजे आपले फोटो असलेले ओळखपत्र आधार कार्ड, निवडणूक कार्ड, पॅन कार्ड तसेच रहिवासी असल्याचा दाखला संबंधित कागदपत्र बँकेस आजपर्यंत दिले नसल्यास, त्वरीत देऊन सहकार्य करावे.
६) बँकेच्या प्रति भागाचे मुल्य रु. २५/- वरुन रु. १०००/- झाल्यामुळे अपुर्ण भागधारकांची यादी बँकेचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेली आहे व त्यांना लेखी स्वरुपात पत्र सुध्दा पाठविले आहे. करिता अपूर्ण भाग धारकांनी भागपुर्तता करण्यात यावी.

## - श्रध्दांजली -

सन २०१६ - १७ या आर्थीक वर्षात जे

सामाजिक, राजकिय, सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, नेते,

आपल्या बँकेचे सन्माननीय संचालक, सभासद व ठेवीदार,

हितचिंतक यांचे दुखःद निधन झाले त्यांना

बँकेतर्फे आदरपुर्वक

कृतज्ञतापूर्वक आणि भावपुर्वक श्रध्दांजली !!!

::::

## - विनित -

**जिजाऊ कमर्शियल को - ऑपरेटिव्ह बँक लि., अमरावती.**

# सन्माननिय

**सभासद बंधु व भगिनींनो,**
**स्नेह व आदरपूर्वक, जय जिजाऊ !**
**आदरनिय महोदय,**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक या आपल्या सर्वांच्या बँकेचा सन २०१६-१७ चा १७ वा वार्षिक अहवाल आपनास सादर करतांना अत्यानंद होत आहे. सन २००० मधे विजयादशमीला मुख्य प्रवर्तक तथा संस्थापक अध्यक्ष या नात्याने माझ्या संस्थापक संचालकांसह लावलेले हे रोपटे आज किशोरावस्थेत आहे. सहकारातील अनेक स्थित्यंतरे जसे की, रिझर्व बँकेच्या धोरणानुसार २००९ पर्यंत शाखा विस्तार बंदी, सहकारी बँकांवर अनेक निर्बंध, सन २०१० पासुन नविन एन्ट्री पॉईन्ट नॉर्मनुसार २०११ पर्यंत एकुण शाखांच्या १०% वाढ व तदनंतर २०१२ पासुन आर्थिक समावेशन **(Financial Inclusion)** सबबीनुसार बँकेच्या नेटवर्थ, नुसार शाखा विस्तार व सहकारी कायद्यातील दुरुस्ती, नंतर क्रियाशिल सभासदांचा बँकेच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग या सर्व घडामोडीतुन आपन संक्रमण करीत आहो. बँकेची ही प्रगती आपल्या सन्हूदय प्रेमामुळे, सामाजिक जाणीवामुळे शक्य झाले. मुख्य शाखा व ११ शाखांच्या विस्तारासह अहवाल वर्षात रु. २२४.९५ कोटी पर्यंत बँकेची उलाढाल झाली आहे.

अहवाल वर्षात तिसऱ्या संचालक मंडळाचा कार्यकाळ १ मे २०१६ ला संपला परंतु सहकार खात्याच्या स्वतंत्र निवडणुक आयुक्तांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार आपल्या बँकेची निवडणुक जानेवारी २०१७ ला अविरोध झाली. एकुण ३२ क्रियाशिल सभासदांनी संचालक होण्याची मनिषा बाळगली व आपसातील सहकारी व खिलाडु वृत्ती व अत्यंत सामंजस्याने काही इच्छुक उमेदवारांनी स्वतःहुन निवडणुक प्रक्रियेतुन माघार घेतल्याने संचालक मंडळ २०१७ ते २०२२ या पाचवर्षा करिता अविरोध निवडुन आले. अंतर्गत पदाधिकारी निवड लोकशाही मार्गाने झाल्याने आपसात एकोपा वृध्दिगंत होण्यास मदत झाली. सहकार क्षेत्राचा व समाजाच्या शिक्षित व्यक्तीनीं अंगिकारलेल्या '' **पे बँक टु सोयायटी,** '' या विचारसरनिचाच नव्हेतर एकनिष्ठतेचा, सहकारी वृत्तीचा हा विजय आहे. आपन सर्वांनी, सहकाराचा हा यशोरथ अविरतपणे बँकेच्या प्रगतीसाठी, आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी कटीबध्द असल्याचेच कृतितुन दर्शविले त्यामुळेच सर्व अभिनंदनास पात्र ठरलो.

बँकेचा सन २००० ते २०११ पर्यंत संस्थापक अध्यक्ष म्हणुन बँकेची ध्येय धोरणे, सामन्य व्यक्ती आर्थिक संपन्न झाली पाहीजे, यासाठी केलेली तळमळ माझ्या सर्वच सहकारी संचालकांनी दिलेले निःस्पृह योगदान, यामुळे बँकेची समाजात निर्माण झालेली विश्वासाहर्यता सर्वांनाच सोबत घेऊन ''**बहूजन हिताय बहूजन सुखाय** '' या तत्वाज्ञानावर आधारलेली आपली बँक सन २०१२ ते २०१७ मधील आव्हानांना तोंड देण्यास समर्थ ठरली. व्यक्ति स्वकेंद्रीत न राहता समाजाभिमुख लोकोउपयोगी व्हाव्यात हाच उद्देश ! नविन संचालक मंडळात संस्थापक संचालकासह समाजाच्या विविध क्षेत्रातील सामान्य व्यक्ती सहभागी झालेल्या असल्याने नवी दिशा, नवीन संधी, नवी क्षितिजे शोधुन एकोप्याने अर्थ संपन्न समाज निर्मितीचे स्वप्न साकार होईल हा मला विश्वास वाटतो !

बँकेचा सभासद व ग्राहक हा केन्द्रबिंदु आहे. सामाजिक संवेदना, आर्थिक प्रश्न, सहकारी बँकेत येणारे ग्राहक, सहकारी बँकेमध्ये राष्ट्रीयकृत बँकेपेक्षा ठेवीवर असलेले जास्त व्याजदर व त्याअनुषंगाने कर्जावरील ३ ते ४ % मार्जीन घेऊन माफक व्याजदर आकारने, **ATM** सेवा, इन्टरनेट सेवा, उपलब्ध करुन

देणे हा कार्यक्रम अहवाल वर्षात राबविण्यासाठी प्रयत्न झालीत. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया NPCI व SBI समवेत करार अंतिम टप्यात आले परंतु सहकारी बँकेच्या KYC नॉर्मसची बंधने SBI ने न स्विकारल्यामुळे सेवा कार्यान्वित झाली नाही. आधुनिक सेवा लवकरच कार्यान्वित करण्याच्या मार्गावर आहे.

अहवाल वर्षात माहे नोव्हेंबर २०१६ ला जुन्या नोटाबंदीनंतर आर.बी.आय. व केंद्र सरकारच्या ध्येय धोरणा नुसार डिजीटल बँकिंग ही संकल्पना पुढे आली. याकरिता भारत सरकार युनिफाईड पेमेंट इंटरफेस, भारत इन्टरफेस फॉर मनी (भीम), आधार पे हे मोबाईल बँकिंगचे ॲपस, विकसित झाले आहेत. भारतातील बँकेला ग्राहकांना मोबाईल बँकिंग सेवा, अधिक कार्यक्षमतेचे देण्याकरीता CORE BANKING ची अत्याधुनिक प्रणाली विकसित झाली. त्यानुसार बँकेला कोअर बँकिंग, अत्याधुनिक सेवा, मोबाईल सेवा, डेटासर्व्हरच्या स्वतंत्रतेबाबत विचार करने, विविध बँकांचे ATM उपयोगात आणने याकरिता नविन संचालक मंडळ भविष्यात अत्याधुनिक बँकींग सकल्पनेकडे अधिक दक्षता घेऊन काम करेल हा विश्वास देतो.

अहवाल वर्षात बँकेच्या एकूण ११ शाखा होत्या. त्यामध्ये व्यवसायवृध्दी झाली. परंतु ढोबळ एन.पी.ए चे एकूण कर्जाशी प्रमाण जास्त असल्याने जरी नक्त NPA शुन्य टक्के होता तरी बँकेला आर.बी.आय. कडून नविन शाखा प्राप्त झालेल्या नाहीत. नविन शाखाविस्ताराचा प्रस्ताव दरवर्षी डिसेंबर मध्ये सादर करण्यात येतो. तो चालु वर्षाचे निकषांवर असल्याने पुढील वर्षी शाखा विस्तार करण्यात येईल. आपल्या बँकेची नेटवर्थ रु. ३१५६ लक्ष असल्याने निश्चितपणे प्रत्येक शाखा सुदृढ निर्माण करणे व नविन शाखा विस्तार करण्यावर आपल्या सर्वांच्या सहकार्याने भर देण्यात येईल. मराठा सेवा संघाच्या सदस्यांनी गाव तेथे शाखा, नगर तेथे शाखा हा संकल्प केला असल्याने या सामाजिक कामात बँकेने अभिरुची घेतली असुन जास्तीत जास्त संघाचे सभासद बँकेत खाते काढुन सहकार्य करित राहील्यास, बँकेला सेव्हींग व करंट खाते (Casa Deposite) मिळाल्यास बँक भविष्यात कर्जा वरिल व्याजदर माफक आकारुण डोळ्यात इंजि. ॲड श्री. ना. पुरुषोत्तम खेडेकर साहेब समाजशिल्पी अभियंता यांनी उद्योगासाठी ८ % दराने कर्ज दिले पाहीजे हि त्यांची संकल्पना व हे स्वप्न साकार करण्यास मदत होईल.

महाराष्ट्रामध्ये ५० ते ५५ टक्के लोकसंख्या असलेला मराठा समाजाने मोर्च्यांची भव्यता दाखवुन राष्ट्रउभारणीचे, शिस्तीचे, नियोजनाचे नवे संकेत दिले आहे. अर्थ संपन्न समाजाची व सुराष्ट्र निर्माणासाठी आणि आर्थिक उन्नतीकरिता जिजाऊ बँकेची सर्वांनी कास धरल्यास २१ व्या शतकात आधुनिक विकसित समाज व राष्ट्र महाविध्यास बँकेचा सिंव्हाचा वाटा असेल. राष्ट्रनिर्माणाकरिता जात, धर्म, पंथ, बाजुला ठेऊन नविन आर्थिक संपन्न व सशक्त पिढी निर्माण करण्यासाठी बँकिंग व्यवहारात सर्व नागरीकांचे सदैव सहकार्य लाभेल हि विनंती. बँकेमध्ये महाराष्ट्रातील कोणत्याही नागरिकांस ठेवी ठेवता येतात. त्यामुळे राज्यातील कोणीही व्यक्ती कोठुनही बँकेत रक्कम ठेऊ शकतो.

अहवाल वर्षात बँकेला महासंगणक निर्माण करणारे मा. पदमभुषन डॉ. विजय भटकर यांनी भेट देऊन बँकिंग इन्डस्ट्रीसमोर नविन आव्हाने असल्याचे सांगितले. सदर आव्हान अत्याधुनिक टेक्नॉलॉजिची साथ मिळाल्यास व समर्पक वृत्तीने इनोव्हेटीव्ह अप्रोच बाळगल्यास राष्ट्रनिर्माणास समाजाच्या प्रत्येक घटकांचा हातभार लागेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बँकेस मा. श्री. पालेकर साहेब उपनिबंधक, श्री. देसाईसाहेब सहआयुक्त आयकर विभाग, इंजि. साळवे साहेब अधिक्षक अभियंता, सौ. तेजस्वीनी वानखडे, जिजाऊ ब्रिगेड तथा जियोलॉजिस्ट, व श्री. जाधवसाहेब सहनिबंधक पुणे, नागपुर शाखेस आमदार. अनिल बोंडे, आणि माजी खासदार, या मान्यवरानी भेटी दिल्या व संचालक मंडळाचे मनोधैर्य वाढविले या बाबत सर्वांचे आभार.

समाजाच्या विभिन्न घटकापर्यंत जाण्याकरिता बँकेनी नुकत्याच बुध्दीबळ स्पर्धा आयोजित करुन विद्यार्थी मध्ये नवचैतन्य निर्माण केले. भविष्यात विद्यार्थी व बँक, वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धांमधुन माँ जिजाऊनी शिवरायास घडविले तसेच बालवयातुन जिजाऊ बँकेच्या माध्यमातुन चांगले विद्यार्थी, चांगले नागरिक, व राष्ट्र घडविण्याचा संकल्प आहे. बँकेच्या आधुनिक इमारतीचे बांधकाम सुरु झाले असुन बांधकाम कामचे अंदाजपत्रक किंमत रु. ३७५ लक्ष आहे. बँकेची वास्तु व्हावी ही आपल्या सर्वांची ईच्छा. सुसज्ज व आत्यांधुनिक आणि आकर्षक सजावटीनी युक्त इमारत पुर्ण करण्याचा मानस आहे. सहकारत एका व्यक्ती पेक्षा अनेकाचा, सर्वांचा सहभाग असतो. काळकाम एक गणितकाप्रमाणे सर्वांचे सहकारांत योगदान असते. त्यामुळेच सहकारी संस्था वृध्दिंगत होतात. ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक मनापासुन विचारांवर वैचारीक बांधीलकीवर प्रेम करणाऱ्या समाजधुरितांचे, समाज बांधवाचे, राष्ट्रावर प्रेमकरणाऱ्या नागरिकांचे, शिक्षकांचे, अभियंताचे, डॉक्टर, वकिल, प्राध्यापक, प्रोफेशनल, देशसेवक, या सर्वांचे सहकार्य व प्रेम सदैव मिळेल. या प्रसंगी सर्वांचे आभार व्देक्त करतो.

बँकेच्या वृध्दीकरिता अनेक सामजिक संघटना विर भगतसिंह कक्ष, जिजाऊ ब्रिगेड, मराठा सेवा संघ इत्यादी कक्षांचे सदैव सहकार्य लाभले. बँकेच्या यशामध्ये प्रसिध्दी माध्यमांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य केले त्या बाबत त्यांचे ऋणनिर्देश. निवडणुक आयुक्त श्री. चौधरी साहेब, निवडणुक अधिकारी श्री. पाळेकर साहेब, जिल्हा उपनिबंधक, श्री. वालदेसाहेब निवडणुक अधिकारी यांनी निर्धारित काळात निःपक्षपणे निवडणुक पार पाडली. बँकेस रिझर्व बँक अधिकाऱ्याकडुन सदैव सहकार्य व गुड गव्हर्निंग अर्बन बँके करिता प्रोत्साहन मिळत आहे. या सर्वांचे मनस्वी आभार.

अहवाल वर्षात बँकेच्या प्रगतीची सक्षिप्त माहिती अहवालात दिली आहे. बँकेची भविष्यात प्रगती व्हावी, समाज अधिक अर्थसंपन्न व्हावा, आधुनिक व डिजीटल इंडियाचे स्वप्न साकार व्हावे या नविन आव्हानांना समर्थपणे पेलण्याचे सामर्थ्य आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच प्राप्त होईल हि मनोकामना. बँकेच्या यशात सर्व ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार !

जिजाऊ बँक हि आर्थीक चळवळ आहे. अर्थ संपन्न समाज निर्मीतीचे स्वप्न आपल्या सर्वांच्या सहकाराने पुर्ण होणार असल्याने जिजाऊ बँकेचा यशोरथ सर्वांच्या सहकार्याने पुढे नेऊ या !

सदिच्छापुर्वक १७ वा वार्षीक अहवाल विन्रमतापुर्वक सादर.

जय जिजाऊ जय सहकार

**संचालक मंडळाचे वतीने**

आपला स्नेहांकित,

**इंजि. अविनाश अं. कोठाळे**

(M.I.E. CIVIL, L.L.B, A.D.I.M, D.M.M)

अध्यक्ष


जिजाऊ कर्मशियल को-ऑप. बँक, लि. अमरातवती.

# बँकेच्या आर्थीक प्रगती बाबत संक्षिप्त

*** भागभांडवल :**


सन २०१६-२०१७ या आर्थीक वर्षामध्ये बँकेच्या भागभांडवलामधे रु. ६२२.८० लक्षा वरुन रु. ७००.९७ लक्ष वाढ झाली असुन सभासद संखेमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. वाढी सबंधातला तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे असुन सभासद संख्येमधे सदर वाढ निर्धारीत लक्ष १०% पेक्षा जास्त आहे. सात्तत्याने वाढ हि बँकेच्या विश्वासनियतेचे प्रतीक आहे.

| वर्ष | सभासद संख्या | वाढ % | भागभांडवल | वाढ % |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | ६१९० | ८.७९ | ६२२.८० | १५.२५ |
| २०१६-१७ | ६७०५ | ८.६७ | ७००.९७ | १२.५५ |
| प्रत्यक्ष वाढ | ५३५ | - | ७८.१७ | - |




## जिजाऊ बँकेचे भागभांडवल रक्कम (रु. लक्ष)

**Chart Showing Share Amount Position of Jijau Bank In lacs**



| आर्थिक वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल | वाढ % |
|---|---|---|---|
| २०१६-१७ | ६७०५ | ७००.९७ | १२.५५% |
| २०१५-१६ | ६१९० | ६२२.८० | १५.२५% |
| २०१४-१५ | ५६९० | ५४०.४० | १२.६४% |
| २०१३-१४ | ५१७० | ४७९.७६ | १४.४७% |
| २०१२-१३ | ४५६४ | ४११.११ | ११.५४% |
| २०११-१२ | ४२७३ | ३७५.७५ | ९.६३% |

*** ठेवी :**

बँकेचे ठेवीवरील व्याजदर महत्तम रु. ८ ते ८.५०% पर्यंत असल्याने चालुआर्थिक वर्षामध्ये ठेवी मागील वर्षाच्या रु. १५४९३ लक्षावरुन रु. १७८८८ झालेल्या आहेत. ठेवी मध्ये होणारी वाढ ही १५.४६ टक्के आहे. नोटबंदीमुळे ठेवीमध्येवाढ झाली हे स्पष्ट आहे. सदर बाबीमुळे सर्वच बँकामधील ठेवीमध्ये वाढ झाली परंतु त्या तुलनेत कर्ज वाढ झाली नाही. त्यामुळे वाढ होऊनही नफ्यात घट झाली आहे. या बाबत भागधारकांनी अभ्यास पुर्ण आकलण करणे आवश्यक आहे.




## जिजाऊ बँकेचे प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्तावरुन अधिक स्पष्ट होईल.


| वर्ष | सभासद | भागभांडवल लक्ष रु. | राखीव व इतर निधी लक्ष रु. | ठेवी लक्ष रु. | कर्ज लक्ष रु. | गुंतवणूक लक्ष रु. | खेळते भांडवल लक्ष रु. | निव्वळ नफा लक्ष रु. | लाभांश | सिआरएआर | ग्रॉस एनपीए रक्कम | ऑडीट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ४५६४ | ४११ | १४२८ | ९५०१ | ६३१७ | ४०८० | ११६९४ | १७८.८५ | १५% | २८.८२ % | ५६१ | 'अ' |
| २०१३-१४ | ५१७० | ४८० | १८१३ | १२३१४ | ७३७६ | ४९६४ | १४८८५ | १७१.४३ | १५% | २२.६३% | ५०४ | 'अ' |
| २०१४-१५ | ५६९० | ५४० | २०९६ | १४१९४ | ८३१४ | ७०४४ | १७०११ | १८४.८१ | १५% | ३२.४६% | ५११ | 'अ' |
| २०१५-१६ | ६१९० | ६२३ | २०३४ | १५४९३ | १००५४ | ६७१३ | १८७३८ | १७५.११ | १२% | १८.४०% | ६२८ | 'अ' |
| २०१६-१७ | ६७०५ | ७०१ | २४५५ | १७८८८ | १०१२८ | ८४३१ | २२४१७ | २००.९७ | १२% (प्रस्तावित) | १८.०७% | ६६१ | 'अ' |

*** ठेवीदारांचे सुरक्षिततेकरीता विमा योजना :**


ठेवीदारांच्या ठेव सुरक्षेकरिता रिझर्व बँकेच्या उपक्रमा अंतर्गत रु. १ लक्षापर्यंत ठेव विमा काढण्यात येतो. डि.आय.जी.सी.एस. प्रिमियम नियमीतपणे बँक जून व डिसेंबरच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या सर्व ठेवीवर अर्धवार्षिक हप्त्याने विमा प्रिमियम जमा करते. अहवाल वर्षात रु. १७.४१ लक्ष प्रिमियम भरलेला आहे. नॅफकॅब या देशपातळीवरील संस्थेने सदर विमा सहकारी बँकाकरीता रु. ५ लक्षापर्यंत काढण्याबाबत विनंती केली आहे.

*** शासकीय प्रतिभुती गुंणवणूक :-**

रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व जून २०१७ ला जाहीर झालेल्या पत धोरणा नुसार तरलता राखण्याकरीता २०.५०% गुंतवणूक ही शासकीय प्रतिभुतीमध्येच करणे अनिवार्य आहे. अहवाल वर्षात बँकेची एकुण गुंतवणूक रु. ८४३८.७४ लक्ष आहे. यापैकी शासकीय प्रतिभूतीमधील गुंतवणूक रु. ५७९०.८८ लक्ष, असुन गुंणवणूक प्रमाण ३२.३७ टक्के आहे. विविध बँका मधील असंविधानिक गुंतणूक रु. २१२२.७८ लक्ष आहे. मागील अर्थिक वर्षामध्ये बँकेच्या एकुण गुंतवणूकीवर रु. ५७०.७६ लक्ष रुपये इतके व्याज मिळाले आहे. शासकिय प्रतिभुतीमधे गुंतवणुक अनिवार्य रिझर्व बँकेने केली परंतु जास्त व्याज दराच्या ठेवी स्विकारुन सरकारच्या कमी व्याजाच्या प्रतिभुतीमधे गुंतवणुक व विक्री केल्यास तोटा व जोखीम आहे.




## जिजाऊ बँकेने केलेले कर्जवाटप (रु. लक्ष)




*** अहवाल वर्षातील कर्ज वितरण :**

बँकेचे अहवाल वर्ष अखेर ३३९० सभासदांना एकूण रु. १०९२७.७६ लक्ष कर्ज वाटप केलेले आहे. मागील वर्षाच्या तुलनेमधे रु. ८५३.५७ लक्ष (८.४७ %) वाढ झालेली आहे.

| अ.क्र. | कर्ज रक्कम (रुपये मध्ये) | एकूण कर्जदार | टक्केवारी | कर्ज वाटप | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५००० पर्यंत | ४६५ | १३.२४ | ८८९.०७ | ८.१४ |
| २. | २५००१ ते ५०००० पर्यंत | ९२७ | २९.२४ | ३७०.६२ | ३.३९ |
| ३. | ५१००१ ते १००००० पर्यंत | ६२८ | १८.७४ | ४३५.२९ | ३.९८ |
| ४. | १००००१ ते ५००००० पर्यंत | ८९३ | २६.६८ | १९३०.२० | १७.६६ |
| ५ | ५००००१ ते १०००००० पर्यंत | २१३ | ६.०६ | १३५०.९८ | १२.३६ |
| ६. | १००००००१ ते २५००००० पर्यंत | १२७ | ३.६२ | १८५०.९९ | १६.९४ |
| ७. | २५०००००१ चे वरील | १३७ | २.४२ | ४१००.६२ | ३७.५२ |
| | एकूण | ३३९० | १००.०० | १०९२७.७७ | १००.०० |

बँकेने अहवाल वर्षात एकूण ३३९० कर्जधारकांना रु. १०९२७.७७ लक्ष कर्ज वाटप केले आहे. सदर कर्जाचे ठेवीशी गुणोत्तर ६१.०९ टक्के आहे. रु. १० लक्षाचे वर कर्ज वितरण २६४ कर्जदारांना केले व त्याचे प्रमाण एकूण कर्जाशी ५४.४६ टक्के आहे. बँकेवर मोठ्या कर्जदारांचे नियंत्रण कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी जास्त सभासदांचा कर्जामध्ये सहभाग घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मागेल त्याला मागणी प्रमाणे परतफेडीची सक्षमता तपासून शिघ्र कर्जप्रमाणानुसार रु. १.५० कोटी पर्यंत वैयक्तीकरित्या देण्यात येईल.

## बँकेची कर्ज प्रकारानुसार कर्ज वाटणी खालील प्रमाणे आहे. (आकडे लक्षात)

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | एकूण कर्जासोबत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅश क्रेडीट | ११०३.६२ | १३४२.३७ | १७२१.८६ | २०४३.७६ | २६४९.४१ | २७८६.८८ | २५.५० |
| २. | गृह तारण | १०५२.६५ | ८७९.६३ | ८१३.०७ | ८३१.७६ | १०१७.५२ | १०३४.८६ | ९.४७ |
| ३. | वैयक्तिक तारण | ९२१.८३ | ११०१.७२ | १०३३.४८ | ७४२.७६ | ५१९.२८ | ३९१.५३ | ३.५८ |
| ४. | एमएसएमई | २३७.१८ | २७०.०३ | ४५०.६५ | ७३२.६७ | ११९८.९४ | १७७४.३२ | १६.२४ |
| ५. | वाहन कर्ज | ५४४.७६ | ५१४.८० | ५४८.९६ | ५४७.४३ | ४८४.१३ | ४५६.१५ | ४.१७ |
| ६. | वैयक्तिक | ६६.७४ | ९४.५४ | १८४.११ | २९४.४१ | २९९.३० | ३६९.५५ | ३.४८ |
| ७. | मुदतीठेव तारण | १६७.६९ | २४५.८३ | ३२५.४१ | ३२७.९१ | ३९१.६५ | ३०६.८७ | २.८१ |
| ८. | वेअर हाऊस कर्ज | १९.०३ | ५८.४५ | २२.३३ | ९.२१ | १७.३१ | २३.२१ | ०.२१ |
| ९. | इतर स्टाफ कर्ज | ०.४४ | ०.८० | ०.४७ | - | ८.५७ | २७.२२ | ०.२५ |
| १०. | शेती कर्ज | ४९८.५७ | ५२३.५१ | ६३५.४० | ७९९.१६ | ८४८.०२ | ८३७.६४ | ७.६६ |
| ११. | शैक्षणिक कर्ज | ३२.८१ | २१.४५ | ३०.९४ | ३१.४३ | ४४.६८ | ४३.८९ | ०.४० |
| १२. | सोने तारण कर्ज | १९१.९३ | ३६८.८५ | ५०७.६३ | ६२४.०५ | ६०२.७३ | ६४८.६५ | ५.९४ |
| १३. | मालमत्ता तारण कर्ज | ३१८.९० | ४७०.१० | ६८४.६८ | ९७१.८८ | १३८७.८३ | १५११.७३ | १३.८३ |
| १४. | ओडी एफ.डी.आर | ३५२.३१ | २८७.३६ | २०२.०८ | २०८.४४ | १७६.९९ | २६६.३४ | २.४४ |
| १५. | एमएसएमई | -- | ९७.२० | ११४.७९ | २२५.६७ | ३७५.७३ | ४४८.९३ | ४.१२ |
| | एकूण | ५४३३.५० | ६३१६.६४ | ७३७५.७६ | ८३१४.६२ | १००५४.०९ | १०९२७.७७ | १००.०० |
| | कर्जामध्ये झालेली वाढ | १८ % | १६.२५ % | १६.७७ % | १२.७३ % | २०.९२ % | ८.६९ % | |

**सन २०१५-१६ च्या तुलनेत अहवाल वर्षात नोटाबंदीमुळे कर्जाची केवळ ८.६९ टक्के वाढ झाली आहे.**

*** कर्ज वितरणाची महत्तम मर्यादा :**

एका व्यक्तीला एकुण भागभांडवलाचे प्रमाणात १५ टक्के व व्यक्ती समुहाला (Group) ४० टक्के महत्तम रिझर्व मार्गदर्शक तत्वानुसार आहे. आपल्या बँकेने २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता कर्जमर्यादा रु. १५० लक्ष व रु. ४५० लक्ष अशी निर्धारित केलेली होती. त्या मध्ये सुधारणा करुन समुहाला रु. ४ कोटी निर्धारित केली आहे. जास्त व्यक्तींचा कर्जाचा सहभाग केल्यास **सहकारात सर्वांचा विकास सर्वांची समृध्दी आहे.**

*** संशयीत व बुडीत कर्जासाठी तरतूद :**

मागील वर्षापर्यंत बँकेची संशयीत व बुडीत कर्जासाठीची तरतूद रु. ८१९.०२/- लक्ष इतकी होती त्यामध्ये रु. २२०/- लक्ष तरतुद करुन रु. १०३९.०२ लक्ष आर्थिक तरतुद आहे. संशयीत व बुडीत कर्जनिधी, उत्पादीत कर्ज, अनुत्पादित कर्ज डि-१, ते डि-३ पर्यंत पुर्ण तरतुद करुन सदरचा निधी अधिक असल्यामुळे नक्त अनुत्पादीत संपतीचे प्रमाण शुन्य टक्के आहे. कोणतेही कर्ज खाते ९० दिवसापेक्षा अनुत्पादीत राहु नये या कडे नियमित कर्ज परतफेड होणे अत्यावश्यक आहे. मोठ्या कर्जदारानी स्वतःचा विकास करत असतांना बँकेचे कर्ज थकविणे हि अनैतिक बाब असल्याने नियमित दिलेल्या मुदतीतच कर्ज परतफेड केली पाहीजे ही अपेक्षा.

*** सामोपचार पध्दतीने कर्ज परतफेड करणे :**

बँक दरवर्षी महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार काही अंशी थकीत खात्यामध्ये सामोपचार पध्दतीचा लाभ देवून वसुली करित आहे. चालु वर्षात एकुण ५ कर्जदार सभासदांनी सदर योजनेचा लाभ घेतला आहे. बँकेचे अनुत्पादक कर्ज कमी करणे हा उद्देश सामोपचार पध्दतीने परतफेड योजनेचा आहे. थकीत कर्जदारांनी या योजनेचा लाभ घेऊन सहकार्य करावे.

*** संचालक व त्यांच्या नातेवाईकाकडील कर्जे :**

बँकेने बँकेच्या संचालक मंडळातील कोणत्याही सदस्यास किंवा त्यांच्या नातेवाईकास कोणतेही कर्ज दिलेले नाही व अशा प्रकारे बँकेने रिझर्व बँकेच्या निर्देशाचे तंतोतंत पालन केलेले आहे.

*** इनकम टॅक्स व इतर टॅक्स :**

बँकेने चालु आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता अग्रीम आयकर म्हणून रु. १८३.६६ लक्ष भरलेला आहे. अहवाल वर्षात आयकर आयुक्त नागपुर यांचेकडुन सन २००६-०७ ते २०१२-१३ पर्यंत आयकर कमी भरल्या बाबत नोटिस प्राप्त झाल्या त्या नुसार अपिल करण्यात आल्याने या मध्ये रु. १७७.५० लक्ष परतावा बँकेस प्राप्त झाला सदर कार्यालयाने सन २०१२ ते २०१६ चे [illegible] पुन्हा नोटिसेस दिल्या असुन आयुक्ताकडे पुन्हा अपील दाखल केले. सदर प्रकरण आयुक्त आयकर नागपुर यांचे कडे प्रलंबित आहे.

*** नफा व नियोजन :**

अहवाल वर्षामध्ये बँकेने कर्ज रकमेवर व्याज रु. १५३९.५० लक्ष, गुंतवणुकीवर रु. ५७०.७६ लक्ष व प्रतिभूती विक्रिवर नफा रु. २३१.१७ व प्रतिभूती वरिल व्याज रु. ६२.८९ लक्ष असे एकुण रु. २४०४.३३ लक्ष मिळविलेले आहेत. त्यामधुन ठेवीवरील व्याज, इतर खर्च वजा करुन **बँकेला चालु वर्षामधे रु. २००.९७ लक्ष निव्वळ नफा झालेला आहे. शासकिय प्रतिभुतिमधे सध्या संपुर्ण पणे मंदी असुन सेकंडरी मार्केट मधिल दर कमी असल्याने या मध्ये तोटा आहे.**

*** लाभांश :**

चालू वर्षासाठी बँकेने **१२ % लाभांश** प्रस्तावित केलेला आहे. बँकेने मुख्य कार्यालयाच्या बांधकामाची सुरुवात केलेली आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी प्रत्येक सभासदाचे वैयक्तिक सहकार्य अपेक्षित आहे.

*** संवैधानिक लेखापरिक्षण :**

आपल्या बँकेचे वर्ष २०१६-१७ साठीचे लेखापरिक्षण मे. झंझारी रमेशकुमार अॅन्ड कंपनी चार्टर्ड अकाउंटट,

नागपूर या संस्थेने केलेले असुन त्यांनी **आपल्या बँकेला ''(अ)'' ऑडीट वर्ग दिलेला आहे.**

*** कर्मचारी, संचालक प्रशिक्षण :**

बँकेच्या सक्षम व निकोप वाढीसाठी संचालक, सोबतच प्रशिक्षित आधिकारी व कर्मचारी असावे लागतात या महत्वाच्या मुद्यावर बँकेने लक्ष केंद्रीत करुन चालु वर्षामधे प्रशिक्षणावर रु. १.३६ लक्ष इतका खर्च केलेला आहे. एकूण सोळा कर्मचारी, अधिकारी यांना प्रशिक्षणांकरिता पूणे, येथे पाठविण्यात आले होते. त्याचप्रमाणे सर्वच कर्मचाऱ्यांना ज्ञानवर्धनाचा लाभ होण्याचे दृष्टीने सुट्टीच्या दिवशी अमरावती येथे श्री. सुधिर मोरे. संचालक ब्लूम पॅर्सनॅलिटी डेव्हलमेंट इन्स्टीट्यूट, मे. यूनिक सपोर्ट प्रा.लि., नागपूर यांच्या तर्फे दिनांक २५-०६-२०१६ ला प्रशिक्षण घेऊन कार्यक्रम राबविण्यात आला. बँकेचे संचालक श्री. बाळासाहेब वैद्य, श्री. अनिल इंगळे, (से.नी.मु.का.अ), प्रा. बुंरगे, श्री. देठे, बँक अधिकारी यांनी सुध्दा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले भागदारकांना सुध्दा प्रशिक्षण मानस असुन प्रशिक्षणा करिता बँकेने ताळेबंदामध्ये विशेष तरतुद केलेली आहे. बँकेमध्ये संध्या एकूण ८९ स्थाई, अस्थाई, कंत्राटी कर्मचारी आहे. कर्मचाऱ्यांचे वेतनावर रु. १८१.४६ लक्ष खर्च आहे.

*** पुरस्कार :**

विदर्भ अर्बन बँक को-ऑप. असोशिएशनच्या वतीने दि. १० जून २०१७ रोजी सन २०१५-१६ करिता जिजाऊ बँकेस रु. १०० जे ५०० कोटी पर्यंतच्या ठेवी असणाऱ्या बँकांच्या गटामधून उत्कृष्ट बँकेचा तृतिय पुरस्कार प्राप्त झालेला आहे. बँको कडून तृतीत पुरस्कार २०१५-१६ करिता दि. २६-११-२०१६ रोजी मा. पद्मभूषन डॉ. विजय भटकर व मा. सहकार आयुक्त श्री. चंद्रकांत दळवी यांचे हस्ते बँकेस प्रदान करण्यात आला. नविन संचालक मंडळास पुरस्कारासोबत बँकिंगमध्ये उत्कृष्ट व नम्र सेवा, कार्यालयीन कामकाजात विशिष्ट, कार्यपध्दती, स्वतः हुन कामे करण्याची कर्मचाऱ्यांची वृत्ती पाहीजे आहे. प्रशिक्षित व समर्पित सेवकांच्या विकासासाठी प्रयत्न सुरु आहे.

*** सामाजिक जाणीव व उपक्रम :**

सामाजीक जाणीव ठेवून बँकेने विविध उपक्रम सुरु केलेले आहेत. **भागधारकांना कोणत्याही प्रकारे नैसर्गीक अथवा अपघाती मुत्यू आल्यास त्यांच्या कुटूंबांना रु. १०,००० अर्थ सहाय्य म्हणुन दिले जाते.** अहवाल वर्षात बँकेने १६ मृतभागधारकांचे वारसदारांना रु. १.६० लक्ष अर्थ सहाय्य मंजुर करुन वितरित केले

. त्याचप्रमाणे **महिलांना उद्योगामध्ये प्राधान्य व प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने बँकेने महिलांकरीता जास्तीतजास्त कर्ज रु. २.०० लक्ष पर्यंत १०% व्याजदराने नविन उद्योग सुरु करण्याकरीता देण्याचे धोरण अवलंबविले आहे.** चालु अर्थिक वर्षामध्ये बँकेने एकुण ११ महिलांना या योजनेचा लाभ दिलेला आहे. बँकेच्या एकूण ११ शाखा कार्यरत आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी बँकेने १२ जानेवारी हा दिवस ''जिजाऊ जन्मदिन सोहळा'' म्हणून मोठ्या उत्साहाने व उल्हासाने साजरा केला.

अमरावती शहरातील मिनी बायपास रस्तावर जिजाऊ पुतळा सौदर्यीकरणाठी बँकेने पुढाकार घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालया समोरील माँ जिजाऊ पुतळा परिसर सौंदर्यीकरण व देखभालीचे काम बँकेने महानगरपालिकेकडून स्वतःकडे घेतलेले आहे. अहवाल वर्षात सदर कामावर रु. ०.६२ लक्ष खर्च झाला आहे. याठिकाणी गुणतपुकीच्या पी.पी.पी. योजने द्वारे विकास करण्यात येईल. ग्रामीण भागातील छोटया छोटया उद्योगांना शेतीपुरक उद्योगांना, शहरातील छोट्या व्यवसाईकांना चालना देण्याच्या उद्देशाने बँक प्रत्यत्नशील आहे.

> संचालक मंडळ सभा व विविध समिती सभा :

संचालक मंडळाच्या नियमित सभा होत असून, अहवाल वर्षात खालील प्रमाणे सभा झालेल्या आहेत.

| अ.क्र. | सभा | एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | संचालक मंडळ | १३ |
| २. | कर्ज समिती | ०९ |
| ३. | कर्मचारी समिती | ०२ |
| ४. | ए.एल.एम. समिती | ०३ |
| ५ | गुंतवणूक समिती | ०२ |
| ६. | एनपीए मॉनिटरिंग व कर्ज वसुली समिती | ०४ |
| ७. | ऑडीट समिती | ०३ |
| ८. | संगणक समिती | ०२ |
| ९. | बांधकाम समिती | ०२ |

संचालक व समिती सदस्यांनी निःस्वार्थपने बँकेस भरपुर वेळ दिलेला आहे.

* **कर्ज वसुली :**

अहवाल वर्ष २०१६-१७ मध्ये बँकेने एकुण वसुली रु. ३६०६.२४ लक्ष व त्यातील एन.पी.ए. वसुली रु. ३०६ कर्ज खात्यात रु. ६२७.९८ करावयाची होती ती अहवाल वर्षात रु. २९३.९१ लक्ष झालेले आहे. नविन संचालक मंडाळाने माहे मार्च २०१७ मध्ये निवड झाल्यापासुन कर्ज वसुली कडे सुक्ष्मपणे लक्ष घातले असुन प्रत्येक थकीत कर्जदारांस कर्ज भरण्याची विनंती केली आहे. नियमीत कर्ज परतफेड करण्यास कर्जधारकांना विनंती आहे.

**आर्थिक वर्षामधील कर्ज प्रकार निहाय कर्ज बाकी, कर्ज वितरण व कर्ज वसुलीचा तक्ता खालील प्रमाणे आहे. (रु. आकडे लक्षात)**

| अ.क्र. | कर्ज प्रकार | एकुण कर्ज येणे बाकी | | | एकूण कर्ज वसुली मुद्दल/व्याज | एकूण कर्ज बाकी दि. ३१.०३.२०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१.०३.१६ ची बाकी | दि. ०१.०४.१६ ते दि. ३१.०३.१७ पर्यंत कर्ज वितरण | एकुण | | A/c | Amt. |
| 1. | Agri. | 802.74 | 189.49 | 992.23 | 137.18 | 231 | 855.05 |
| 2. | Edu. | 44.68 | 1.20 | 45.88 | - | 6 | 45.88 |
| 3. | Lab | 1387.83 | 592.15 | 1979.98 | 468.25 | 145 | 1511.73 |
| 4. | MSME | 1574.65 | 927.66 | 2502.31 | 293.97 | 251 | 2208.34 |
| 5. | CC | 2649.41 | 427.00 | 3076.41 | 294.98 | 185 | 2781.43 |
| 6. | Spl | 551.28 | 69.99 | 621.27 | 229.74 | 151 | 391.53 |
| 7. | Uspl | 299.30 | 277.46 | 576.76 | 207.21 | 654 | 369.55 |
| 8. | VL | 484.13 | 195.23 | 679.36 | 223.22 | 494 | 456.14 |
| 9. | Housing | 1017.52 | 329.14 | 1346.66 | 311.80 | 256 | 1034.86 |
| 10. | Other | 1242.55 | 1471.60 | 2713.15 | 1439.89 | 1017 | 1073.26 |
| | **Total** | 10054.09 | 447992 | 14534.01 | 3606.24 | 3390 | 10927.77 |

थकीत कर्जदारांचे प्रमाण वाढत असल्याने बँकेने सर्व थकीत कर्जदारांना नोटीसेस देऊन वसुली सक्तीने करण्याची कार्यवाही अवलंबीली आहे. त्यामुळे थकीत कर्जदारांनी तीन किस्त किंवा ९० दिवसापेक्षा कर्ज हफ्ता थकीत राहणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे ही विनंती. ज्या कर्जदारांना अडचणी आहे. त्यांनी बँके कडे विनंती अर्ज देऊन कर्ज पूर्नस्थापना करणे आवश्यक आहे.


# बँकेचे कर्ज थकीत प्रकरणांचा गोषवारा दर्शविणारा तक्ता

## NPA Accounts Dated 31.03.2017

| SR. No. | BRANCH NAME | SUB-STANDARD | | | D - I | | | D - II | | | D - III | | | TOTAL | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A/C | AMT | PRO. | A/C | AMT | PRO. | A/C | AMT | PRO. | A/C | AMT | PRO. | A/C | AMT | PRO. |
| 1 | MAIN BRANCH | 22 | 88.93 | 13.34 | 27 | 186.36 | 50.17 | 25 | 73.36 | 31.49 | 43 | 95.42 | 95.42 | 117 | 444.07 | 190.42 |
| 2 | GADGE NAGAR | 15 | 14.71 | 2.20 | 21 | 6.82 | 3.39 | 10 | 3.27 | 2.74 | 82 | 79.21 | 79.21 | 128 | 104.01 | 87.54 |
| 3 | AKOLA | 12 | 38.10 | 5.77 | 7 | 1.52 | 1.49 | 5 | 1.19 | 0.91 | 7 | 6.50 | 6.50 | 31 | 47.32 | 14.67 |
| 4 | ACHALPUR | 16 | 20.20 | 3.15 | 2 | 2.95 | 1 | | | | | | | 18 | 23.15 | 4.15 |
| 5 | DARYAPUR | 7 | 18.58 | 2.86 | 1 | 7.84 | 1.96 | 4 | 6.28 | 3.01 | | | | 12 | 32.70 | 7.83 |
| 6 | KATHORA | 6 | 11.11 | 1.67 | | | | | | | | | | 6 | 11.11 | 1.67 |
| 7 | YAVATMAL | 9 | 6.02 | 0.9 | 2 | 0.81 | 0.81 | | | | | | | 11 | 6.83 | 1.71 |
| | TOTAL | 87 | 197.85 | 29.89 | 60 | 206.30 | 58.82 | 44 | 84.10 | 38.15 | 132 | 181.13 | 181.13 | 323 | 669.19 | 307.99 |

सदर थकीत कर्ज वसुली करीता सहकारी कायदा कलम १०१ चे प्रमाणपत्र तथा सरफेशि कायद्यानुसार मालमत्ता विक्रीची कार्यवाही करण्यात येईल. कर्ज घेणे, स्वविकास करणे व कर्ज नियमित न भरणे हा सहकाराचा सामाजिक अपराध आहे. बँक समाज व राष्ट्र विकासासाठी कर्जफेडीची नैतिकता अंगिकारने हाच सहकार व सहकार्य आहे.

## सन २०१६-१७ चे उत्पन्न व खर्च दर्शविणारा आलेख



# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक,लि. अमरावती.
## अंदाज पत्रक : २०१७ - १८ (विषय क्र. ४ चे प्रपत्र)

अ) उत्पन्न बाजू

(रुपये लक्षात)

| अ.क्र. | विवरण | अंदाजपत्रकातील सन २०१६-१७ ची तरतूद | सन २०१६-१७ चे प्रत्यक्ष उत्पन्न | अंदाज पत्रकातील उत्पन्नात वाढ/घट | सन २०१७-१८ चे अपेक्षीत उत्पन्न (अंदाज पत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्याज (कर्ज व गुंतवणूक वरील) | २२५०.०० | २११०.२७ | - १३९.७३ | २५००.०० |
| २. | कमिशन | १०.०० | ४.४९ | -५.५१ | १०.०० |
| ३. | इतर उत्पन्न | १९०.०० | २८९.५७ | +९९.५७ | २००.०० |
| | **एकूण** | **२४५०.००** | **२४०४.३३** | **-४५.६७** | **२७१०.००** |

ब) खर्च बाजू

| अ.क्र. | विवरण | अंदाजपत्रकातील सन २०१६-१७ ची तरतूद | सन २०१६-१७ चे प्रत्यक्ष खर्च | अंदाज पत्रकातील खर्च वाढ/घट | सन २०१७-१८ चे अपेक्षीत उत्पन्न (अंदाज पत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्याजखर्च | १४००.०० | १२९४.०७ | -१०५.९३ | १५५०.०० |
| २. | कर्मचारी पगार खर्च (पगार,पी.एफ व इतर) | २००.०० | १८१.४६ | -१८.५४ | २५०.०० |
| ३. | भाडे | ४५.०० | ३७.९४ | -७.०६ | ५०.०० |
| ४. | विद्युत व पाणी खर्च | १०.०० | १०.१७ | +०.१७ | १५.०० |
| ५. | पोस्टेज/टेलीफोन खर्च | ६.०० | १०.७४ | +४.७४ | १५.०० |
| ६. | स्टेशनरी/ प्रिंटींग | १०.०० | ७.१६ | -२.८४ | १५.०० |
| ७. | न्युजपेपर व पेरॉडिकाल | १.०० | ०.३० | -०.७० | १.०० |
| ८. | रिपेअर चार्जेस | ५.०० | १.९९ | -३.०१ | ५.०० |
| ९. | कन्व्हेअंस चार्जेस | १०.०० | २.१९ | -७.८१ | १०.०० |
| १०. | क्लिअरिंग चार्जेस | २.०० | १.०३ | -०.९७ | २.०० |
| ११. | विमा खर्च | २५.०० | २४.६५ | -०.३५ | ३५.०० |
| १२. | कार्यालय खर्च | १०.०० | १.५७ | -८.४३ | १०.०० |
| | | **१७२४.००** | **१५७३.२७** | **-१५५.६४ +४.९१** | **१९५८.००** |
| | | | | **-१५०.७३** | |

| अ.क्र. | विवरण | अंदाजपत्रकातील सन २०१६-१७ ची तरतूद | सन २०१६-१७ चे प्रत्यक्ष खर्च | अंदाज पत्रकातील खर्चात वाढ/घट | सन २०१७-१८ चे अपेक्षीत खर्च (अंदाज पत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| | मागील बाकी | १७२४.०० | १५७३.२७ | -१५५.६४ +४.९१ | १९५८.०० |
| १३. | शासकीय कर (आयटी इत्यादी) | १५०.०० | २००.३१ | +५०.३१ | १५०.०० |
| | अ) कर (अग्रिमकर रु.१८४ लक्ष) | | | | |
| १४. | असोसिएटस् मेंबरशिप | २.०० | २.४१ | +०.४१ | ३.०० |
| १५. | कार्यालयीन नोटीस/प्रसिध्दी/वसुली | ८.०० | ०.५८ | -७.४२ | ८.०० |
| १६. | कोर्ट केसेस खर्च | ६.०० | १.०८ | -४.९२ | ६.०० |
| १७. | ऑडीट व इतर फी | १०.०० | ९.१४ | -०.८६ | १०.०० |
| १८. | सभा खर्च | १.०० | ०.३१ | -०.६९ | २.०० |
| १९. | आमसभा खर्च | ६.०० | ५.२९ | ०.७१ | ७.०० |
| २०. | झिज खर्च | ३०.०० | २८.८९ | -१.११ | ३५.०० |
| २१. | तरतुद | १५०.०० | २८४.१७ | +१३४.१७ | १५०.०० |
| २२. | इतर खर्च | ६३.०० | २१.६६ | -४१.३४ | ६८.०० |
| | अ) नविन शाखा नुतनीकरण खर्च | -- | -- | -- | -- |
| | ब) किरकोळ खर्च | -- | -- | -- | -- |
| | क) वसुली खर्च | -- | -- | -- | -- |
| २३. | कल्याण निधी | १०.०० | -- | -१०.०० | १०.०० |
| २४. | सेक्युरिटी सर्विस चार्जेस | २१.०० | १९.३० | -१.७० | २५.०० |
| २५. | खेळ व स्पर्धा | २.०० | ०.०० | -२.०० | २.०० |
| २६. | प्रशिक्षण | ५.०० | १.३६ | -३.६४ | ५.०० |
| २७. | कमिशन, ब्रोकरेज | ४५.०० | ३४.६९ | -१०.३१ | ४५.०० |
| २८. | एएमसी चार्जेस | १.०० | ०.१२ | -०.८८ | १.०० |
| २९. | सॉफ्टवेअर भाडे | १६.०० | २०.७८ | +४.७८ | २५.०० |
| ३०. | नफा | २००.०० | २००.९७ | +०.९७ | २००.०० |
| | **एकूण** | **२४५०.००** | **२४०४.३३** | -४५.६७ | **२७१०.००** |
| | | | | -२४१.२२ +१९५.५५ | |

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (शरद भोकसे) | (रामचंद्र ठाकरे) | (प्रा.अनिल बंड) | (इंजि.राजेन्द्र जाधव) | (इंजि. अविनाश कोठाळे) |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी | संचालक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |